# महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा स्पर्धा परीक्षा

**१. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील:-**

**१.१** राज्य शासनाच्या सेवेतील तांत्रिक राजपत्रित गट-अ व गट-ब संवर्गातील खालील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार सदर परीक्षेमधून भरण्यात येतात:-

| अ.क्र. | | संवर्ग | पदाचे नाव | वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तर | उच्च पदावर बढतीची संधी | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| **(१) महाराष्ट्र वनसेवा :-** | | | | | | |
| १ | **महसूल व वन विभाग** | **सहायक वनसंरक्षक, गट-अ** | | S-१८ : ४९१००-१५५८०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | ज्येष्ठता व पात्रतेनुसार महाराष्ट्र वनसेवेतील वरिष्ठ पदावर | महाराष्ट्रात कोठेही |
| २ | | **वनक्षेत्रपाल, गट-ब** | | S-१५ : ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | | |
| **(२) महाराष्ट्र कृषि सेवा :-** | | | | | | |
| १ | **कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग** | **कृषि अधिकारी,गट अ** | | S-२० : ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमानुसार देय इतर भत्ते. | ज्येष्ठता व पात्रतेनुसार महाराष्ट्र कृषिसेवेतील वरिष्ठ पदावर | महाराष्ट्रात कोठेही |
| २ | | **कृषि अधिकारी, गट ब** | | S-१६ : ४४९००-१४२४०० अधिक महागाई भत्ता व नियमानुसार देय इतर भत्ते. | | |
| ३ | | **कृषि अधिकारी,गट ब कनिष्ठ** | | S-१५ : ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | | |
| **(३) महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा :-** | | | | | | |
| १ | **(१) जलसंपदा विभाग, (२) सार्वजनिक बांधकाम विभाग, (३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग** | **स्थापत्य अभियांत्रिकी** | **सहायक कार्यकारी अभियंता, गट-अ (स्थापत्य)** | S-२० : ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमानुसार देय इतर भत्ते. | ज्येष्ठता व पात्रतेनुसार उच्च कार्यकारी व प्रशासकीय पदावर | महाराष्ट्रात कोठेही |
| २ | | | **सहायक अभियंता, गट-अ (स्थापत्य)** | S-२० : ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमानुसार देय इतर भत्ते. | | |
| ३ | | | **सहायक अभियंता, गट-ब (स्थापत्य) श्रेणी-२** | S-१५ : ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | | |
| ४ | **मृद व जलसंधारण विभाग** | **स्थापत्य अभियांत्रिकी** | **उप विभागीय जलसंधारण अधिकारी, स्थापत्य, गट - अ** | S-२० : ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमानुसार देय इतर भत्ते. | | |
| ५ | | | **जलसंधारण अधिकारी स्थापत्य, गट-ब** | S-१५ : ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते.. | | |
| ६ | **(१) जलसंपदा विभाग (२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग** | **यांत्रिकी अभियांत्रिकी** | **सहायक अभियंता, यांत्रिकी, गट-ब, श्रेणी-२** | S-१५ : ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | | |
| ७ | **सार्वजनिक बांधकाम विभाग** | **विद्युत अभियांत्रिकी** | **सहायक अभियंता, विद्युत, गट- ब, श्रेणी-२** | S-१५ : ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | | |
| ८ | **जलसंपदा विभाग** | **विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी** | **सहायक अभियंता, विद्युत व यांत्रिकी, गट- ब, श्रेणी-२** | S-१५ : ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | | |

**१.२** वेतनश्रेणी मध्ये शासनाच्या धोरणानुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**१.३** शासनाच्या मागणीनुसार भरावयाच्या पदांचा तपशील, पदसंख्या, आरक्षण, अर्हता, इत्यादी बाबी जाहिरात / अधिसूचनेद्वारे उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात येतील.

**१.४** शासनाकडून विहित कालावधीत प्राप्त होणाऱ्या मागणीपत्राच्या आधारे उपलब्ध संवर्गाची पदे जाहिरातीद्वारे/अधिसूचनेमध्ये नमूद करण्यात येतील व त्याच्या आधारे पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

**२. परीक्षेचे टप्पे:-**

**२.१** प्रस्तुत परीक्षा एकूण **तीन** टप्प्यात घेण्यात येईल:-

| | | |
|---|---|---|
| **(१) संयुक्त पूर्व परीक्षा** | **(२)प्रत्येक संवर्गाची स्वतंत्र मुख्य परीक्षा** | **(३) मुलाखत** |

**२.२** जाहिरातीमध्ये नमूद सर्व संवर्गातील पदभरतीकरीता एकच संयुक्त पूर्व परीक्षा घेण्यात येईल.

**२.३** ज्या संवर्गाच्या पदभरतीसाठी शासनाकडून मागणीपत्र प्राप्त झाले आहे; त्या संवर्गाची पदे जाहिरातीमध्ये नमूद करण्यात येतील .

**२.४** संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन, अर्ज करणा-या उमेदवारांकडून ते जाहिरातीमध्ये नमूद संबंधित संवर्गाच्या/परीक्षेच्या पात्रतेनुसार एक किंवा एकापेक्षा जास्त संवर्ग/परीक्षांसाठी बसू इच्छितात किंवा कसे, याबाबत विकल्प (Option) घेण्यात येईल.

**२.५** जाहिरातीस अनुसरून आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे एखाद्या आणि अथवा सर्व संवर्ग/परीक्षांकरिता उमेदवाराने दिलेला/ले विकल्प हा/हे संबंधित संवर्गाच्या/परीक्षेच्या पद भरतीकरीता अर्ज समजण्यात येईल/येतील.

**२.६** संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर करताना परीक्षेसाठी दिलेला/ले विकल्प व माहिती अंतिम समजण्यात येईल तसेच प्रस्तुत विकल्प/माहितीच्या आधारेच पुढील भरती प्रक्रियेकरीता पात्रता आजमाविण्यात येईल.

**२.७** संयुक्त पूर्व परीक्षेस अर्ज करताना दिलेला विकल्प तसेच, संबंधित संवर्गाच्या परीक्षेमधून भरावयाच्या पदसंख्येच्या आधारे, मुख्य परीक्षेसाठी पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या निश्चित करुन, सामाईक पूर्व परीक्षेमधील गुणांच्या आधारे प्रत्येक परीक्षेसाठी स्वतंत्र निकाल जाहीर करण्यात येईल.

**२.८** संयुक्त पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे संबंधित संवर्गाकरीता घेण्यात येणा-या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांची स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

**२.९** संबंधित संवर्गाच्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमाच्या आधारे प्रत्येक संवर्गाकरीता स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

**२.१०** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी उमेदवारांची संख्या विहित मर्यादेत सिमित करण्यासाठी पूर्व परीक्षा घेण्यात येते. पूर्व परीक्षेसाठी आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेसाठी पात्र समजण्यात येते.

**२.११** पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीच्या वेळी विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच, पूर्व परीक्षेचे गुण उमेदवारांना कळविले जाणार नाहीत.

**२.१२** संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर करताना परीक्षेसाठी दिलेला/ले विकल्प व अर्जामध्ये नमूद माहिती यामध्ये बदल करण्याबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत नंतरच्या टप्प्यावर मान्य करण्यात येणार नाही.

**३. उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन :-**

**३.१** वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना, उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच, प्रत्येक चुकीच्या उत्तरामागे २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**३.२** एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५ % किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**३.३** एखादा प्रश्न अनुत्तरित असेल तर अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही.

**३.४** वरीलप्रमाणे कार्यपद्धतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच गणण्यात येईल व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल.

**४.पात्रता:-**

**४.१** भारतीय नागरिकत्व

**४.२ वयोमर्यादा:-**

| संवर्ग | वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | वय | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | किमान अमागास / मागासवर्गीय / आ. दु. घ. | कमाल | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी | | दिव्यांग उमेदवार |
| | | | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ/ आ. दु. घ. | अमागास | मागासवर्गीय/ आ. दु. घ. | अमागास | मागासवर्गीय / आ. दु. घ. | |
| **सहायक वनसंरक्षक, गट-अ** | जाहिरातीमध्ये नमूद दिनांक | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | अपात्र |
| **वनक्षेत्रपाल, गट-ब** | | २१ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | अपात्र |
| **महाराष्ट्र कृषि सेवा** | | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| **महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा** | | १९ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |

**४.३** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल करण्यात येणार नाही.

**४.४ अर्हता :-**

**४.४.१ शैक्षणिक अर्हता:-**

**(एक)** प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणाऱ्या विविध संवर्ग/पदांकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | सहायक वनसंरक्षक, गट-अ | **(एक)** खालील विषयांपैकी कमीत कमी एका विषयाची मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी :-<br>(१) वनस्पतीशास्त्र (२) रसायनशास्त्र (३) वनशास्त्र (४) भूशास्त्र (५) गणित (६) भौतिकशास्त्र (७) सांख्यिकी (८) प्राणिशास्त्र (९)उद्यानविद्या (१०) पशुसंवर्धन व पशुवैद्यकशास्त्र किंवा<br>**(दोन)** कृषि, अभियांत्रिकी, यातील स्नातक पदवीधर |
| २ | वनक्षेत्रपाल, गट-ब | **(एक)** वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, वनशास्त्र, भूशास्त्र, गणित, भौतिकशास्त्र, सांख्यिकी, प्राणिशास्त्र, उद्यानविद्या शास्त्र, कृषी शास्त्र, कृषी अभियांत्रिकी,रसायन अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी, विदयुत अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी, संगणक ॲप्लिकेशन, संगणक विज्ञान, पर्यावरणीय विज्ञान, पशुवैद्यकीय विज्ञान यांपैकी कोणत्याही विषयातील सांविधिक विदयापीठाची विज्ञान शाखेची पदवी किंवा<br>**(दोन)** विज्ञान शाखेव्यतिरिक्त इतर शाखेतील गणित विषयासह पदवीधारक व विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>**(तीन)** शासन पत्र, महसूल व वन विभाग, क्रमांक : एफएसटी-०९/१८/प्र.क्र.३६६/फ-४, दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार खालील विद्याशाखेतील पदवीधर उमेदवार पदवीमध्ये गणित विषय घेवून उत्तीर्ण झाले असल्यास व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा विज्ञान शाखेत असल्यास वनक्षेत्रपाल संवर्ग/पदासाठी पात्र असतील :-<br>(१) BE/B.Tech. Automobile Engineering<br>(२) BE/Tech. Power<br>(३) BE/B.Tech. Production<br>(४) BE/B.Tech. Metallurgy and Material<br>(५) BE/B.Tech. Textile<br>(६) BE- Information Technology<br>(७) BE- Instrumentation<br>(८) B.Sc. - Biotechnology<br>(९) B. Pharmacy<br>(१०) B.Tech. - Food Science |
| ३ | कृषि अधिकारी, गट अ | **(एक)** मान्यताप्राप्त संस्थेकडून कृषि किंवा कृषि अभियांत्रिकी अथवा उद्यानविद्या या विषयातील पदवी किंवा त्याच विदयाशाखेतील अन्य कोणतीही समतुल्य अर्हता.<br>**(दोन)** प्रस्तुत भरतीकरीता शासन निर्णय, कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक : आकृवि-१२११/प्रक्र २०८/१५ए, दिनांक ७ सप्टेंबर, २०११ अन्वये खालील शैक्षणिक अर्हता बी.एसस्सी (कृषि)/बी.टेक (कृषि अभियांत्रिकी) व तत्सम पदव्यांशी समतुल्य म्हणून मान्य केल्या आहेत:-<br>(१) बी.एसस्सी (कृषि जैव तंत्रज्ञान), (२) बी.एसस्सी (कृषि व्यवसाय व्यवस्थापन), (३) बी.एसस्सी (गृह विज्ञान), (४) बी.टेक (अन्नतंत्र) (५) बी.एफ.एसस्सी., (६) बी.एसस्सी (उद्यानविद्या) ,<br>**(तीन)** प्रस्तुत भरतीकरीता शासन निर्णय कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग क्रमांक: मकृप १०२१/प्र.क्र.६३/७अ, दिनांक २२ एप्रिल, २०२१ अन्वये बी. एससी (ऑनर्स) कृषि या पदवीशी समतुल्य ठरविण्यात आलेल्या खालील पदव्यांचा समावेश करण्यात येत आहे:-<br>(१) बी. एससी (ऑनर्स) उद्यानविद्या, (२) बी. एससी (ऑनर्स) वनविद्या, (३) बी. एससी (ऑनर्स) सामाजिक विज्ञान,(४) बी. एफ.एससी (मत्स्य विज्ञान), (५) बी. टेक (कृषि अभियांत्रिकी), (६) बी. टेक (अन्नतंत्रज्ञान), (७) बी. टेक (जैवतंत्रज्ञान), (८) बी. एससी. (एबीएम)/ बी. बी. एम (कृषि)/ बी. बी. ए.(कृषि)/ बी. एससी (ऑनर्स) कृषि व्यवसाय व्यवस्थापन |
| ४ | कृषि अधिकारी, गट ब | |
| ५ | कृषि अधिकारी, गट ब कनिष्ठ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | स्थापत्य अभियांत्रिकी | सहायक कार्यकारी अभियंता, गट-अ (स्थापत्य) | **(एक)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने त्या पदवीशी समतुल्य असल्याचे घोषित केलेली तत्सम अर्हता.<br>**(दोन)** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकिर्ण-२०१३/(४५/१३)/भाग-१/तांशि-२, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ नुसार खालील शैक्षणिक अर्हता स्थापत्य अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाशी समतुल्य आहेत:-<br>(१) B.E. / B. Tech.(Civil and Water Management)<br>(२) B.E. / B. Tech. (Civil and Environmental)<br>(३) B.E./ B. Tech. (Structural)<br>(४) B.E./ B. Tech. (Construction Engineering/Technology) |
| ७ | | सहायक अभियंता, गट-अ (स्थापत्य) | |
| ८ | | सहायक अभियंता, गट-ब (स्थापत्य) | |
| ९ | स्थापत्य अभियांत्रिकी | उप विभागीय जलसंधारण अधिकारी, (स्थापत्य) गट - अ | |
| १० | | जलसंधारण अधिकारी स्थापत्य, गट-ब | |
| ११ | यांत्रिकी अभियांत्रिकी | सहायक अभियंता, यांत्रिकी, गट-ब | **(एक)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची यंत्र अभियांत्रिकी मधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवी समतुल्य असल्याचे घोषित केलेली तत्सम अर्हता.<br>**(दोन)** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकिर्ण-२०१३/(४५/१३)/भाग-१/तांशि-२, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ नुसार खालील अर्हता यांत्रिक अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाशी समतुल्य आहेत:-<br>(१) B.E./B. Tech.(Automobile), (२) B.E./ B. Tech.(Production) , (३) B.E./ B. Tech.(Industrtial) |
| १२ | विद्युत अभियांत्रिकी | सहायक अभियंता, विद्युत, गट- ब | **(एक)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकीमधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवी समतुल्य असल्याचे घोषित केलेली तत्सम अर्हता.<br>**(दोन)** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकिर्ण-२०१३/(४५/१३)/भाग-१/तांशि-२, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ नुसार खालील अर्हता विद्युत अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाशी समतुल्य आहेत:-<br>(१) B.E./B. Tech.( (Electrical and Power)<br>(२) B.E./ B. Tech.( (Electronics and power)<br>(३) B.E./ B. Tech.( (Power System)<br>(४) B.E./ B. Tech.( (Electrical and Electronics) |
| १३ | विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी | सहायक अभियंता, विद्युत व यांत्रिकी, श्रेणी-२, गट-ब | **(एक)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकीमधील किंवा विद्युत व यांत्रिकी मधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवी समतुल्य असल्याचे घोषित केलेली तत्सम अर्हता.<br>**(दोन)** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, , क्रमांक संकिर्ण-२०१३/(४५/१३)/भाग-१/तांशि-२, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ नुसार खालील अर्हता विद्युत अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाशी समतुल्य आहेत:-<br>(१) B.E./ B. Tech.( (Electrical and Power)<br>(२) B.E. / B. Tech.( (Electronics and power)<br>(३) B.E. / B. Tech.( (Power System)<br>(४) B.E./ B. Tech.( (Electrical and Electronics) |

**(दोन) सर्व पदांकरीता** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.

**(तीन)** पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**(चार)** अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारकाने शैक्षणिक अर्हतेबाबतची अट मुख्य परीक्षेची माहिती/अर्ज स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यंत पूर्ण केली असली पाहिजे.

**४.४.२ शारीरिक अर्हता:-**

**(एक )** खाली नमूद पदावरील नियुक्तीसाठी वर नमूद केलेल्या अर्हतेसोबत उमेदवाराची शारीरिक अर्हता त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे असणे आवश्यक आहे:-

| पदाचे नाव | पुरुष उमेदवारांकरीता | महिला उमेदवारांकरीता |
|---|---|---|
| **(१) सहायक वनसंरक्षक, गट-अ**<br>**(२) वनक्षेत्रपाल, गट-ब** | **(अ) अनुसूचित जमाती व्यतिरिक्त अन्य उमेदवार** | |
| | उंची - १६३ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती - न फुगवता ७९ सें.मी. (कमीत कमी)<br>फुगविण्याची क्षमता- न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी.पेक्षा कमी नसावा. | उंची - १५० सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी) |
| | **(ब)अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार** | |
| | उंची –१५२.५ सें.मी.(अनवाणी)(कमीत कमी)<br>छाती - न फुगवता ७९ सें.मी. (कमीत कमी)<br>फुगविण्याची क्षमता- न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी.पेक्षा कमी नसावा. | उंची - १४५ सें.मी.पेक्षा कमी नसावी |
| | **(क)दृष्टी** :- सुधारणेनंतर (After Correction) + 4.00 D सह प्रत्येक डोळयाची दृष्टितीक्ष्णता (Visual Acuity) ६/६ असावी. बाह्य डोळयावर कोणतेही रोग संक्रमण झालेले नसावे किंवा तिरळेपणा नसावा. | |
| | **(ड) सहायक वनसंरक्षक, गट-अ करीता** पुरुष व महिला उमेदवारांची अनुक्रमे **२५** कि.मी. व **१४** कि.मी. अंतर चार तासांत चालून पूर्ण करण्याची शारिरीक क्षमता असणे आवश्यक.<br>**वनक्षेत्रपाल, गट-ब** पुरुष व महिला उमेदवारांची अनुक्रमे **२५** कि.मी. व **१६** कि.मी. अंतर चार तासांत चालून पूर्ण करण्याची शारिरीक क्षमता असणे आवश्यक. | |

**(दोन)** नियुक्तीसाठी शिफारस झालेल्या उमेदवारांची नियुक्ती करण्यापूर्वी त्यांची शारीरिक मोजमापे शासनाच्या संबंधित विभागामार्फत सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात येतील.

**(तीन)** अर्जातील माहितीच्या आधारे शारिरीक मोजमापे लक्षात घेवून लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे शारीरिक मोजमाप चाचणीसाठी उमेदवाराचा विचार केला जाईल. विहित शारीरिक मोजमापे अर्जामध्ये आढळून न आल्यास शारीरिक मोजमाप चाचणीसाठी उमेदवारी विचारात घेतली जाणार नाही.

**(चार)** संबंधित पदासाठी आवश्यक शारीरिक मोजमापे न भरल्यास उमेदवार सदर पदावर नियुक्तीसाठी अपात्र ठरेल. तसेच शारीरिक मोजमापाच्या तपासणीमध्ये अपात्र ठरणा-या उमेदवाराची अन्य संवर्ग /पदासाठी शिफारस केली जाणार नाही.

**५. शुल्क (फी):-**

**५.१** प्रस्तुत परीक्षेकरीता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | परीक्षा शुल्क | |
|---|---|---|---|
| | | अमागास | मागासवर्गीय व अनाथ |
| (१) | महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा संयुक्त पूर्व परीक्षा | ₹ ३९४ /- | ₹ २९४ /- |
| (२) | महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा | ₹ ५४४ /- | ₹ ३४४/- |
| (३) | महाराष्ट्र कृषि सेवा मुख्य परीक्षा | ₹ ५४४ /- | ₹ ३४४/- |
| (४) | महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा | ₹ ५४४ /- | ₹ ३४४/- |
| (५) | महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा | ₹ ५४४ /- | ₹ ३४४/- |
| (६) | महाराष्ट्र यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा | ₹ ५४४ /- | ₹ ३४४/- |
| (७) | महाराष्ट्र विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा | ₹ ५४४ /- | ₹ ३४४/- |

**५.२** विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग या प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रिमी लेयर) मोडणाऱ्या उमेदवारांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**५.३** उन्नत व प्रगत गटासंदर्भातील (क्रिमी लेयर) उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तदअनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

**६. पूर्व परीक्षा: -**

**६.१ परीक्षा योजना:-**

**६.१.१ परीक्षेचे टप्पे:- एक लेखी परीक्षा**

**६.१.२ परीक्षेचे गुण - एकूण २०० गुण**

**६.१.३ प्रश्नपुस्तिका - एक (अनिवार्य)**

**६.१.४ प्रश्नपुस्तिकेचे स्वरुप:- खाली नमूद केल्याप्रमाणे एक अनिवार्य प्रश्नपुस्तिका असेल :-**

| संकेतांक | विषय | प्रश्नांची संख्या | गुण | दर्जा | माध्यम | परीक्षेचा कालावधी | प्रश्नपुस्तिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१४ | मराठी | १०० | २०० | बारावी | मराठी | **एक तास** | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | इंग्रजी | | | पदवी | इंग्रजी | | |
| | सामान्य क्षमता चाचणी | | | पदवी | मराठी व इंग्रजी | | |

**६.२ अभ्यासक्रम-**:सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावरील ‘ उमेदवारांना सूचना ’ अंतर्गत ‘अभ्यासक्रम’ या सदराखाली उपलब्ध आहे.

**६.३ परीक्षा केंद्र :-**

**६.३.१** खालील सहा ठिकाणी सदर पूर्व परीक्षा घेण्यात येईल:-

| जिल्हा केंद्र | जिल्हा केंद्राचा सांकेतांक | जिल्हा केंद्र | जिल्हा केंद्राचा सांकेतांक |
|---|---|---|---|
| (१)अमरावती | **१४** | (४) नागपूर | **३२** |
| (२)औरंगाबाद | **१५** | (५) नाशिक | **३५** |
| (३) मुंबई | **३०** | (६) पुणे | **३८** |

**६.३.२** उपरोक्त जिल्हा केंद्रांमधून कोणतेही एक जिल्हा केंद्र अर्ज सादर करताना निवडणे अनिवार्य आहे.

**६.३.३** जिल्हा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**६.३.४** विहित पध्दतीने अर्ज/माहिती सादर करताना उमेदवारांने परीक्षेकरीता निवडलेले जिल्हाकेंद्र तसेच जिल्हा केंद्रावरील शाळा/ महाविद्यालयाच्या उपलब्धतेनुसार विविध परीक्षा उपकेंद्रावर अर्जातील दाव्यानुसार प्रथमदर्शनी पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**६.३.५**एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रांवर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था नजिकच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

**६.३.६** एकदा निवडलेल्या जिल्हा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या परीक्षा उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**६.३.७** वरीलप्रमाणे जिल्हा केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या कायमस्वरुपी रहिवासाच्या पत्त्याच्याआधारे संबंधित महसुली मुख्यालयाच्या जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**६.४ पूर्व परीक्षेचा निकाल:-**

**६.४.१** संयुक्त पूर्व परीक्षेस अर्ज करताना संवर्ग/ परीक्षेसाठी दिलेला विकल्प तसेच, संबंधित संवर्गाच्या परीक्षेमधून भरावयाची पदसंख्या लक्षात घेऊन मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या निश्चित करण्यात येते. तसेच सामाईक पूर्व परीक्षेमधील गुण पात्रतेच्या आधारे प्रत्येक संवर्ग/परीक्षेसाठी स्वतंत्र निकाल जाहीर करण्यात येईल.

**६.४.२** संबंधित संवर्गाच्या परीक्षेमधून भरावयाच्या एकूण पदांच्या सुमारे १२ पट उमेदवार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र होतील, अशा रीतीने प्रथम टप्प्यात गुणांची सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. तद्नंतर, दुस-या टप्प्यात प्रत्येक आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गातील पदांसाठी १२ पट उमेदवार उपलब्ध होण्याची निश्चिती करण्यासाठी जरुरीप्रमाणे सीमारेषा खाली ओढली जाईल. तथापि, अशा पध्दतीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी दुस-या टप्प्यात पात्र ठरलेले अतिरिक्त उमेदवार केवळ त्यांच्या आरक्षित पदावरील निवडीसाठी पात्र असतील.

**६.४.३** अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू उमेदवारांकरीता गट-अ व गट-ब संवर्गासाठी पदे आरक्षित असल्यास प्रत्येक संवर्गासाठी स्वतंत्र गुणांची सीमारेषा निश्चित करण्यात येईल.

**६.४.४** केवळ सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांच्या सीमारेषेच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अंतिम निवडीच्या वेळी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाईल. सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांसाठी असलेली सीमारेषा शिथिल करुन मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेले उमेदवार अंतिम शिफारशीच्या वेळी फक्त संबंधित आरक्षित पदासाठी पात्र ठरतील.

**६.४.५** प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**६.४.६** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**६.४.७** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल व निकाल जाहीर झाल्याबाबतची माहिती आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत भ्रमणध्वनी

क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल. तथापि, लघुसंदेशाद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्याची सुविधा ही अतिरिक्त सुविधा असून आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला निकाल हाच अधिकृत मानण्यात येईल.

**६.४.८** पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

**६.४.९** जाहिरातीस अनुसरून पूर्व परीक्षेकरीता अर्जाद्वारे केलेल्या विविध दाव्यास अनुसरून कागदपत्रे/पुरावा सादर करणे अनिवार्य आहे.

## ७. मुख्य परीक्षा

**७.१** संबंधित संवर्गाच्या परीक्षेकरीता विहित करण्यात आलेल्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमानुसार स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

**७.२ परीक्षेस प्रवेश:-**

**७.२.१** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाकडून निश्चित केलेल्या सीमांकन रेषा व मर्यादेनुसार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्हताप्राप्त ठरणाऱ्या तसेच जाहिरात/अधिसूचनेतील तरतुदींनुसार आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**७.२.२** मुख्य परीक्षेकरीता आयोगाच्या कार्यालयाकडून अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळाद्वारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलद्वारे अर्ज करता येईल. त्यावेळी मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाकडून विहित करण्यात आलेल्या पद्धतीने जिल्हा केंद्र निवडून परीक्षा-शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**७.२.३** जाहिरातीस अनुसरून पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्ज करतेवेळी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता नसल्यास व मुख्य परीक्षेकरीता आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत संबंधित शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यास, अशा उमेदवाराला शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक नमूद करता येईल.

**७.२.४** पूर्व परीक्षेच्या अर्जामधील इतर कोणत्याही दाव्यामध्ये बदल करता येणार नाही.

**७.३. परीक्षा योजना:-**

**७.३.१ परीक्षेचे टप्पे :- प्रत्येक संवर्गाकरीता दोन (१) लेखी परीक्षा ४०० गुण (२) मुलाखत ५० गुण.**

**७.३.२ एकूण प्रश्नपुस्तिका:- प्रत्येक संवर्गाकरीता दोन**

**७.३.३ प्रश्नपुस्तिकेचे स्वरुप:-**

प्रत्येक संवर्गाच्या लेखी परीक्षेमध्ये खालीलप्रमाणे त्यांच्या समोर नमुद केल्याप्रमाणे अनिवार्य प्रश्नपुस्तिका असतील:-

| पेपर क्रमांक | विषय व संकेतांक | प्रश्न संख्या | गुण | दर्जा | माध्यम | एकूण कालावधी | प्रश्नपुस्तिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **(१) महाराष्ट्र वनसेवा (मुख्य ) परीक्षा** | | | | | | | |
| **एक** | General Studies (037) | १०० | २०० | पदवी | मराठी व इंग्रजी | १ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| **दोन** | General Science and Nature Conservation (038) | १०० | २०० | पदवी | इंग्रजी | १ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| **(२) महाराष्ट्र कृषिसेवा (मुख्य ) परीक्षा** | | | | | | | |
| एक | कृषि विषयक सामान्य ज्ञान(५११) | १०० | २०० | कृषि पदवी | इंग्रजी | १ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| दोन | कृषि विज्ञान व तंत्रज्ञान (५१२) | १०० | २०० | कृषि पदवी | इंग्रजी | १ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| **(३) महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा, (मुख्य ) परीक्षा** | | | | | | | |
| एक | स्थापत्य अभियांत्रिकी (०१८) | १०० | २०० | बी. ई. (स्थापत्य) | इंग्रजी | २ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| दोन | स्थापत्य अभियांत्रिकी (०१९) | १०० | २०० | बी. ई. (स्थापत्य) | इंग्रजी | २ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| **(४) महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा,(मुख्य) परीक्षा** | | | | | | | |
| एक | विद्युत अभियांत्रिकी (०२२) | १०० | २०० | बी. ई. (विद्युत) | इंग्रजी | २ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| दोन | विद्युत अभियांत्रिकी (०२३) | १०० | २०० | बी. ई. (विद्युत) | इंग्रजी | २ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| **(५) महाराष्ट्र यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा (मुख्य ) परीक्षा** | | | | | | | |
| एक | यांत्रिकी अभियांत्रिकी (९६३) | १०० | २०० | बी. ई. (यांत्रिकी) | इंग्रजी | २ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| दोन | यांत्रिकी अभियांत्रिकी (९६४) | १०० | २०० | बी. ई. (यांत्रिकी) | इंग्रजी | २ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

| (५) महाराष्ट्र विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा (मुख्य ) परीक्षा | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एक | विद्युत अभियांत्रिकी (०२२) | १०० | २०० | बी. ई. (विद्युत) | इंग्रजी | २ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| दोन | विद्युत अभियांत्रिकी (०२३) | १०० | २०० | बी. ई. (विद्युत) | इंग्रजी | २ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**७.३.४ अभ्यासक्रम :-**

सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सूचना' अंतर्गत 'अभ्यासक्रम' या सदराखाली उपलब्ध आहे.

**७.४ परीक्षा केंद्र:-**

**७.४.१** खालील सहा ठिकाणी सदर मुख्य परीक्षा घेण्यात येईल:-

| जिल्हा केंद्र | जिल्हा केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| (१)अमरावती | **१४** |
| (२)औरंगाबाद | **१५** |
| (३) मुंबई | **३०** |

| जिल्हा केंद्र | जिल्हा केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| (४) नागपूर | **३२** |
| (५) नाशिक | **३५** |
| (६) पुणे | **३८** |

**७.४.२** उपरोक्त जिल्हा केंद्रांमधून कोणतेही एक जिल्हा केंद्र अर्ज सादर करताना निवडणे अनिवार्य आहे.

**७.४.३** जिल्हा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**७.४.४** विहित पध्दतीने अर्ज/माहिती सादर करताना उमेदवारांने परीक्षेकरीता निवडलेले जिल्हाकेंद्र तसेच जिल्हा केंद्रावरील शाळा/ महाविद्यालयाच्या उपलब्धतेनुसार विविध परीक्षा उपकेंद्रावर अर्जातील दाव्यानुसार प्रथमदर्शनी पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**७.४.५**एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रांवर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली_तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था नजिकच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

**७.४.६** एकदा निवडलेल्या जिल्हा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या परीक्षा उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**७.४.७** वरीलप्रमाणे जिल्हा केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या कायमस्वरुपी रहिवासाच्या पत्त्याच्याआधारे संबंधित महसुली मुख्यालयाच्या जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**७.५ मुख्य परीक्षेचा निकाल:-**

**७.५.१** संबंधित संवर्गाकरीता भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी सुमारे ३ पट उमेदवार मुलाखतीकरीता उपलब्ध होतील, अशा रीतीने सर्व पेपरच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. सदर सीमारेषा सर्व उमेदवारांसाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी तसेच महिला, दिव्यांग, खेळाडू, अनाथ इत्यादींसाठी वेगवेगळी असेल.

**७.५.२** अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू उमेदवारांकरीता गट-अ व गट-ब संवर्गासाठी पदे आरक्षित असल्यास प्रत्येक संवर्गासाठी स्वतंत्र गुणांची सीमारेषा निश्चित करण्यात येईल.

**७.५.३** प्रत्येक आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांना त्यांनी अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात, असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुलाखतीसाठी पात्र समजण्यात येईल.

**७.५.४** लेखी परीक्षेमधून मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त होण्याकरीता शतमत (Percentile) पध्दत लागू आहे. प्रस्तुत परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणा-या उमेदवाराच्या एकूण गुणांच्या तुलनेत खालीलप्रमाणे किमान शतमत गुण प्राप्त करणारे उमेदवार मुलाखतीच्या पात्रतेकरीता विचार करण्यास पात्र असतील:-

(१) अमागास - किमान ३५ शतमत
(२) मागासवर्गीय - किमान ३० शतमत
(३) दिव्यांग - किमान २० शतमत
(४) अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू - किमान २० शतमत
(५) अनाथ - किमान ३० शतमत

**७.५.५** दिव्यांग अथवा अनाथ अथवा अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू या आरक्षित प्रवर्गाच्या किमान सीमा रेषेच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरणारा उमेदवार कोणत्याही ही एकाच सवलतीसाठी पात्र असेल.

**७.५.६** लेखी परीक्षेचा निकाल व निकाल जाहीर झाल्याबाबतची माहिती आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**७.५.७** मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावरील संबंधित उमेदवाराच्या खात्यामध्ये मुलाखतपत्र उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच भ्रमणध्वनी क्रमांकावर लघुसंदेशद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल. तथापि, वैयक्तिकरित्या लघुसंदेशाद्वारे कळविण्याची सुविधा ही अतिरिक्त सुविधा असून आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला निकाल हाच अधिकृत मानण्यात येईल.

**७.५.८** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉन-क्रिमी लेयर) असलेल्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, व इतर

मागास वर्ग या प्रवर्गातील उमेदवार तसेच दिव्यांग, खेळाडू, महिला व अनाथ उमेदवार लेखी परीक्षेत केवळ त्यांच्यासाठी विहित केलेल्या निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त झाल्यास अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी अराखीव(खुला) पदासाठी विचारात घेतली जाणार नाही. उमेदवाराच्या पात्रतेनुसार संबंधित प्रवर्गासाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता गुणवत्तेनुसार असे उमेदवार पात्र असतील.

**७.६ मुलाखत:-**

**७.६.१** विहित सीमांकन रेषेनुसार लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

**७.६.२** मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

**७.६.३** विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच त्याकरीता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**७.६.४** वरीलप्रमाणे लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांच्या मुलाखती आयोगाच्या कार्यक्रमानुसार तसेच आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित वेळेस घेण्यात येतील.

**७.७ निकाल :—**

**७.७.१** लेखी परीक्षा आणि मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करुन संबंधित संवर्गाच्या परीक्षेकरीता सर्वसाधारण गुणवत्ता यादी (Merit list) तयार करण्यात येईल.

**७.७.२** सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येईल.

**७.७.३ संवर्ग/पदांचा पसंतीक्रम:-**

(**एक**) संबंधित परीक्षेधून एकापेक्षा जास्त पदे भरावयाची असल्यास (बहुसंवर्गीय भरतीप्रक्रिया) सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या आधारे मुलाखतीस उपस्थित सर्व उमेदवारांना संबंधित परीक्षेमधून भरावयाच्या संवर्ग/पदांचा पसंतीक्रम सादर करण्यासाठी ७ दिवसाचा कालावधी उपलब्ध करून देण्यात येईल.

(**दोन**) संवर्गाचा/पदाचा पसंतीक्रम नमूद करण्याची फक्त एकच संधी उमेदवारांस खालील अटींवर देण्यात येईल:-

(१) ज्या संवर्गाच्या परीक्षेमधून एकापेक्षा जास्त संवर्गाची आणि/अथवा विभागाची पदे भरावयाची आहेत, अशा संवर्गाच्या परीक्षेमधून अंतिम निवडीसाठी संवर्ग/पदाचा पसंतीक्रम सादर करणे अनिवार्य राहील.

(२) पसंतीक्रम ऑनलाईन पद्धतीने आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

(३) पसंतीक्रम आयोगास सादर केल्यानंतर पदाच्या पसंतीक्रमात बदल करण्यासंबंधीच्या विनंतीचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

(४) आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने पसंतीक्रम सादर न केल्यास संबंधित उमेदवाराचा अंतिम पदावरील निवडीकरीता विचार करण्यात येणार नाही

(५) पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये शारीरिक पात्रता व शैक्षणिक अर्हतेच्या दाव्यांच्या आधारे संबंधित संवर्ग/पदासाठी उमेदवाराची पात्रता आजमावली जाईल.

(६) एखाद्या संवर्गासाठी विहित शारिरिक पात्रतेच्या व शैक्षणिक अर्हतेच्या अटी व शर्ती पूर्ण न करणाऱ्या उमेदवारास संबंधित संवर्गासाठी पसंतीक्रम सादर करता येणार नाही.

(७) दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत शासन निर्णयान्वये दिव्यांग उमेदवारांना एखाद्या पदावर नियुक्तीसाठी अपात्र ठरविले असल्यास त्याचा संबंधित संवर्ग/पदासाठी विचार केला जाणार नाही. याबाबतचा तपशील जाहिरात/अधिसूचनेमध्ये दिला जाईल.

**८. भरती प्रक्रियेतून बाहेर पडणे(Opting out option) :-**

**८.१** उमेदवारांकडून विहित पद्धतीने व विहित कालावधीत प्राप्त संवर्गाच्या/पदांच्या पसंतीक्रमाच्या आधारे तात्पुरती निवड यादी(Provisional Selection List) तयार करण्यात येईल.

**८.२** बहुसंवर्गीय भरतीप्रक्रिया नसलेल्या परीक्षांकरीता सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या आधारे प्रचलित पद्धतीनुसार तात्पुरती निवड यादी (Provisional Selection List) तयार करण्यात येईल.

**८.३** तात्पुरती निवड यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल व त्याच्या आधारे भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय (Opting Out) ऑनलाईन पद्धतीने सादर करण्यासाठी संबंधित उमेदवारांना ०७ दिवसांचा कालावधी देण्यात येईल.

**८.४** तात्पुरती निवड यादी तसेच भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय सादर केलेल्या उमेदवारांचा विदा[Data] लक्षात घेऊन अंतिम शिफारस यादी (Final Recommendation List) तयार करण्यात येईल.

**८.५** बहुसंवर्गीय भरतीप्रक्रियेकरीता पदांचे “पसंतीक्रम सादर करणे” तसेच सर्व स्पर्धा परीक्षेद्वारे भरतीप्रक्रियेकरीता “भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे ” याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये करणे अनिवार्य असेल. यासंदर्भातील इतर कोणत्याही पद्धतीने केलेल्या विनंतीचा विचार कोणत्याही परिस्थितीमध्ये केला जाणार नाही.

**९. शिफारस:-**

**९.१** अंतिम शिफारस यादी तयार करताना समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांची क्रमवारी(Ranking) आयोगाच्या दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकामधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात येईल.

**९.२** "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येतील.

**९.३** शिफारसपात्र उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**९.४** शिफारसपात्र उमेदवारांना त्यांच्या नियुक्तीसाठी शासनाकडे शिफारस करण्यात आलेली आहे किंवा नाही याबाबतची माहिती आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावरील उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करून दिली जाईल.

**१०. उत्तरपत्रिकेची प्रत व इतर तपशील :-**

वस्तुनिष्ठ बहुपर्यायी पद्धतीच्या पेपरची उत्तरपत्रिका संबंधित परीक्षेच्या निकालानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे संबंधित उमेदवाराच्या प्रोफाईलद्वारे खालील तपशीलासह उपलब्ध करून देण्यात येईल :-

(१) मूळ उत्तरपत्रिकेची स्कॅन इमेज

(२) निकालाकरीता गृहित धरलेले गुण

(३) उमेदवार पात्र असलेल्या प्रवर्गाकरीताच्या गुणांची किमान सीमांकन रेषा.

**११.** प्रस्तुत परीक्षा योजना उमेदवारांना परीक्षेचे स्वरुप समजण्यास सुलभता व्हावी, या हेतूने प्रसिध्द करण्यात येत असून यामधील कोणतीही तरतूद प्रस्तुत परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय व आयोगाच्या कार्यनियमावली यांमधील तरतुदींशी विसंगत असल्यास त्या-त्यावेळच्या परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय तसेच आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदी ग्राह्य धरण्यात येतील.

सह सचिव, जाहिरात

दिनांक :- ३० सप्टेंबर , २०२२ — महाराष्ट्र लोकसेवा आयोग.